# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १४-०८-२०१३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक १४-०८-२०१३ रोजी मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१.१५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (म) श्री.पेडगावकर, नगरसचिव श्री. ओ. सी. सिरसाट तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. नारायण तिलोकचंद कुखे्
३. स.स. श्री. खेडकर सुशिल तुकाराम
४. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१२. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१३. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१६. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१७. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
१८. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
१९. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२०. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२१. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२२. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२३. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२४. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२५. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२६. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२७. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२८. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
२९. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३०. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३१. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
३२. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३३. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३४. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३५. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३६. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३७. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३९. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४०. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४१. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४२. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
४३. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४४. स.स.श्री.खान आगा मिया खान
४५. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४६. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४७. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
४८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५०. स.स.श्री. वैद्य रेणूकादास (राजु) दत्तोपंत
५१. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
५२. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
५३. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव

५५. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५६. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५७. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
५८. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
५९. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६०. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६१. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६२. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६३. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
६४. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
६५. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
६६. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
६७. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
६८. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
६९. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
७०. स.स.श्री. जैन विकास रतनलाल
७१. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७२. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७३. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
७४. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
७५. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
७६. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
**३.** श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.संजय केनेकर :पाकिस्तानने भारत सिमेवर भ्याड हल्ला केला त्यात भारताचे ५ जवान शहीद झाले त्या घटनेचा निषेध करावा व शहीद जवानांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : यास माझे अनुमोदन आहे तसेच प्रा. ब्रम्हानंदजी देशपांडे यांचेही दु:खद निधन झाले ते मोठे अभ्यासक होते त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर : ब्रम्हानंदजी देशपांडे हे थोर व्यक्ती होते त्यांचे या शहरासाठी मोठे योगदान होते त्यांचा इतिहासावर तसेच शिला लेखनावर मोठा अभ्यास होता त्यांचे नुकतेच दु:खद निधन झाले तसेच जेष्ठ अभिनेते स्व.प्राण व जगदीश राज यांचेही निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी

श्री.सुशिल खेडकर :यास अनुमोदन आहे.
श्री.गजानन बारवाल

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.
या वेळी भारत-पाक सिमेवर शहीद झालेले ५ जवान तसेच प्रा.स्व ब्रम्हानंदजी देशपाडे तसेच जेष्ठ अभिनेते स्व. प्राण व जगदीश राज यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**ऐनवेळचा विषय**

**विषय क्रमांक २७४:**

शहर अभियंता हे पद शासनाच्या दिनांक ०४.०५.२००६ च्या आकृतीबंधात मंजूर करण्यात आलेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतील शहर अभियंता हे नियत वयोमानाने दिनांक ३१.०५.२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(५) अन्वये शहर अभियंता हे पद सेवानिवृत्तीचे तारखेपासून ४ महिन्याचे आत भरणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदर पदावर पदस्थापना करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण (३) अन्वये समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने कार्यकारी अभियंता संवर्गात सध्या कार्यरत श्री.एस.डी. पानझडे, श्री स. सिंकंदर अली व श्री एच. ए. कोल्हे यांच्या सेवाविषयक, ज्येष्ठता, गूणवत्ता इत्यादी बाबींचा सर्वांगीन अभ्यास करून श्री. एस. डी. पानझडे कार्यकारी अभियंता यांच्या नावाची शिफारस शहर अभियंता पदासाठी केली आहे. तसेच शहर अभियंता या पदावर त्यांना पदस्थापना / नेमणूक द्यावयाची असल्यास अशी नेमणूक/पदस्थापना ही श्री. डी. पी. कुलकर्णी यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक ४८७६/२०१० च्या अंतीम निकालाच्या अधीन राहून देण्यात यावी. असेही समितीने अहवालात नमूद केले आहे.

करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (१) प्रमाणे श्री. एस. डी. पानझडे यांची शहर अभियंता या पदावर कायमस्वरूपी पदस्थापना वेतनश्रेणी पे बॅंड रू. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रू. ६,६००/- मध्ये करणेसाठी शिफारस करण्यात येते. शहर अभियंता म्हणून नियुक्तीनंतर ते तिन्ही कार्यकारी अभियंता/अभियांत्रिकी विभागांचे विभागप्रमूख आणि नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

तसेच शहर अभियंता पदाची श्रेणीवाढ करून सदर पद अधिक्षक अभियंता संवर्गात रुपांतरीत करणेसाठी ठराव क्र ९२ दिनांक ३१.०१.२००८ (दिनांक १८.०१.२००८ ची सभा) व ठराव क्रमांक ४५५ दिनांक ०७.०९.२०११ अन्व्ये महासभेने पारीत केलेले आहेत व सदर पदाची वेतनश्रेणी पे बॅंड रू. १५,६००-३९,१०० ग्रेड वेतन रु. ७,६००/- मध्ये करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. तो शासनाच्या विचाराधिन आहे. शासनाने त्यास मान्यता प्रदान केल्यास पदनामासह सदरची वेतनश्रेणी श्री. एस. डी. पानझडे देय राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :-**

श्री.काशिनाथ कोकाटे :ऐनवेळी प्रशासनाच्या वतीने विषय आलेला आहे सद्यस्थितीत आचार संहिता आहे हा विषय घेण्यासाठी शासनाची परवानगी वगैरे घेतली का माहिती देण्यात यावी.

श्री.प्रशांस देसरडा :ऐनवेळी जो आताच विषय दिला त्यास माझा विरोध नोंदवून घ्यावा.

मा.महापौर :नगरसचिव यांनी सविस्तर खुलासा करावा.

नगरसचिव : ऐनवेळचा प्रशासनातर्फे विषय देण्यात आला तो विषय घेणे बाबत मा.आयुक्त यांनी मा.महापौर यांना कळविण्यात आले आहे. त्यांचे पत्रामध्ये ऐनवेळचा विषय घेणे बाबत भारत निवडणुक आयोगाचे अंडर सेक्रेटरी मा.श्री.कुमार राजीव यांनी दिनांक १३ ऑगस्ट २०१३ रोजी पत्र पाठवले त्या पत्रात उल्लेख केला की दिनांक १४-८-२०१३ रोजी सभा आयोजित केली त्या सभेमध्ये शहर अभियंता पदाचा प्रस्ताव घेणेस आयोगाचे कुठलेही ऑब्जेक्शन नाही असे कळविल्यानुसार मा.आयुक्त महोदय यांनी मा.महापौर यांना शहर अभियंता पदाचा प्रस्ताव ऐनवेळी घेणे बाबत कळविले आहे नगरसचिव यांना एक प्रत दिली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रशासनाने सर्व दखल घेवून हा प्रस्ताव ठेवला मा.निवडणुक आयोगाची मान्यता ,मा.आयुक्तांची मान्यता आहे रूटींग प्रोसेस मधील प्रस्ताव शहर अभियंता पद रिक्त होत असेल तर त्या पदावर दुसरेची नेमणूक करणे आवश्यक आहे सर्व नियम लक्षात घेता हा प्रस्ताव मंजूर करावा

श्री.अफसर खान :मंजूरी देण्यात यावी. चर्चा करण्याची गरज नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे निवडणुक आयोगानी सुध्दा हा प्रस्ताव घेण्यास मंजूरी दिली आहे शहर अभियंता पद सध्या रिक्त आहे ते भरणे आवश्यक आहे या प्रस्तावास मंजूरी दयावी शहर अभियंता यांनी शहरातील कामे तातडीने मार्गी लावावी.

श्री.गजानन बारवाल :या पदा संदर्भात श्री.डी.पी कुलकर्णी यांनी मा.न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे त्यानुसार जो निर्णय न्यायालयाचा या पदाच्या संदर्भात येईल त्या निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही व्हावी.

श्री.राजू शिंदे :हा विषय अगोदरच यायला पाहिजे.या सभागृहाच्या मान्यतेने नगरसचिव तसेच उपआयुक्त सारखी पदे भरली चांगले अधिकारी नियुक्त होत असेल हरकत नाही मा.आयुक्त श्री.कांबळे साहेब यांनी समिती गठीत करून कार्यवाही करण्याचा चांगला पायंडा सुरू केला व समितीने श्री.पानझडे यांची शिफारस केली त्यांचे अभिनंदन करतो परंतु शहरात आता मोठया प्रमाणात खड्डे झाले व रस्त्याची दयनीय अवस्था आहे ते चित्र त्यांनी बदलावे अशी अपेक्षा करतो कोणत्याही रिक्त पदावर नियुक्ती करतांना कमेटी मार्फत अहवाल मागवूनच कार्यवाही करावी जो ठराव आलेला आहे त्यास मंजूरी दयावी.

श्री.त्रिंबक तुपे : हा ठराव एकमताने मंजूर करावा शहरातील सर्व वार्डातील विकास कामे व्हावी आता ही जबाबदारी शहर अभियंता यांचेवर असणार आहे शहरातील सर्व भागातील सर्व कामे करण्या बाबत अधिकारी यांना सुचना कराव्यात.

डॉ.जफर खान :शहरात सध्या मोठया प्रमाणात खड्डे झालेले आहे प्रशासनाने शहर अभियंता पदाचा प्रस्ताव सादर केला कमेटीच्या मार्फतही शिफारस झाली कमेटीने लवकर अहवाल दिला त्याबध्दल कमेटीचे अभिनंदन जो प्रस्ताव आलेला आहे त्यास मंजूरी दयावी

श्री.महेश माळवतकर :शहर अभियंता पद भरण्या बाबत प्रस्ताव आला कमेटीने श्री.पानझडे यांनी शिफारस केली मंजूर करावे आता शहर अभियंता यांनी शहरातील विकास कामे तातडीने करण्या बाबत प्रयत्न करावे.

श्री.सुशिल खेडकर :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता हा विषय मंजूर करावा.

मा.महापौर :- महानगरपालिकेत शहर अभियंता हे पद रिक्त असून या पदावर पदस्थापना करण्यासाठी प्रशासनाने समिती गठीत केली होती. समितीने दिलेल्या अहवालानूसार तसेच या पदावर पदस्थापना/नेमणूक द्यावयाची असल्यास अशी नेमणूक/पदस्थापना ही श्री. डी.पी.कुलकर्णी यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका क्रमांक ४८७६/२०१० च्या अंतिम निकालाच्या अधिन राहून श्री. एस. डी. पानझडे यांची शहर अभियंता या पदावर प्रस्तावात नमुद केलेल्या वेतन श्रेणीमध्ये पदस्थापना/नेमणूक करण्यास मंजुरी देण्यात येते. या पदास अधिक्षक अभियंता या संवर्गात रुपांतरीत करण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता झाल्यास पदनामासह प्रस्तावात नमुद केलेली वेतन श्रेणी श्री. एस. डी. पानझडे यांना देय राहील. या प्रमाणे प्रस्तावास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापालिकेच्या शहर अभियंता या रिक्त पदावर पदस्थापना/नेमणूक करण्यासाठी प्रशासनाने गठीत केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (१) प्रमाणे श्री. एस. डी. पानझडे यांची शहर अभियंता या पदावर कायमस्वरूपी पदस्थापना वेतनश्रेणी पे बँड रू. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रू. ६,६००/- मध्ये करणेसाठी व अशी नेमणूक/पदस्थापना ही श्री. डी. पी. कुलकर्णी यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्रमांक ४८७६/२०१० च्या अंतीम निकालाच्या अधीन राहून करण्यास तसेच शहर अभियंता पदाची श्रेणीवाढ करून सदर पद अधिक्षक अभियंता संवर्गात करणेसाठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मंजुरी आल्यास पदनामासह प्रस्तावात नमुद केलेली वेतनश्रेणी श्री. एस. डी. पानझडे यांना देय राहील. यासह या प्रस्तावास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.